


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३०५, शनिवार २४ ऑगस्ट २०२४ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# पारनेरचा उमेदवार महाराष्ट्रात सर्वाधिक मतांनी विजयी होणार !

## ■ खासदार नीलेश लंके यांचा विश्वास ■ राज्यात महाविकास आघाडीचीच सत्ता येणार

सुपा : विशेष प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणूकीत पारनेर- नगर मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार राज्यात सर्वाधिक मतांनी विजयी होईल असा विश्वास खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

पारनेर-नगर मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा मेळावा तसेच बुथ कमिटी सदस्यांची बैठक नगर- पुणे महामार्गावरील ग्रीन हेवन मंगल कार्यालयात पार पडली. यावेळी लंके यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, लोकसभा निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर आतापर्यंत वेळ न मिळाल्याने या मेळाव्यास उशिर झाला. या निवडणूकीत जे यश मिळाले ते तुमच्या प्रामाणिक कामचे फळ आहे. मीच नीलेश लंके म्हणून प्रत्येकाने परीश्रम केल्याने मोठया शक्तीला आपण पराभूत करू शकलो. काही लोक आपणास तुमचे काम आहे का असे म्हणून हिणवत होते मात्र सामुहिक जबाबदारीमुळे हिनवणारांना मतपेटीतून आपण उत्तर देऊ शकल्याचे खा. लंके म्हणाले.

खा.लंके पुढे म्हणाले, विविध कार्यकर्त्यांवर तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली होती. प्रत्येकाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली. पारनेर तालुक्यात आपण पाठीमागे आहोत असे विरोधकांनी चित्र रंगविले होते. मला केवळ दोन दिवस तालुक्यासाठी देता आले तरीही ३९ हजारांचे मताधिक्य मिळाले. हे प्रामाणिक कामाचे यश असल्याचे लंके यांनी सांगितले. आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर अनेकांच्या डोळयात आश्रू उभे राहिले. मात्र प्रत्येक जाण लोकसभा निवडणूकीत जीव ओतून काम करणार याची मला खात्री होती. ही निवडणूक तुमच्याच पाठबळावर आपण जिंकू असा विश्वास होता. महिला भगिनींनीही मतदारसंघात फिरून प्रचाराची धुरा सांभाळली. महाविकास आघाडीचा उमेदवार एक लाखांच्या मताधिक्क्याने विजयी झाला पाहिजे अशी खुणगाठ प्रत्येकाने बांधावी. उमेदवारी देण्याचा अधिकार मला नाही. शरद पवार, उध्दव ठाकरे, बाळासाहेब थोरात हे उमेदवार देणार आहेत. तुमच्या भावना मी पक्षश्रेष्ठींसमोर मांडेल. या जिल्हयात प्रत्येक मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार निवडूण आणण्याची माझ्यावर जबाबदारी असल्याचे लंके यांनी सांगितले. अ‍ॅड. राहुल झावरे यांनी सूत्रसंचालन केले.



■ पारनेर-नगर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस व नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खा. नीलेश लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### समन्वयकांनी विविध मतदारसंघाची जबाबदारी सांभाळावी

लोकसभा निवडणूकीत ज्या गावांमध्ये समन्वयक होते. त्यांनी त्या त्या मतदारसंघात जाऊन महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचे नियोजन करायचे आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठा मताधिक्क्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी परीश्रम करायचे असल्याच्या सुचना लंके यांनी यावेळी दिल्या.

### तालुक्यातील भावी भावीच राहणार

तालुक्यात भावींची चर्चा सुरू आहे. ते भावीच राहणार आहेत. तुम्ही ज्यांच्या अंगावर गुलाल टाकाल तोच तालुक्याचा आमदार होणार आहे. लोकसभा जिंकली आता विधानसभाही आपणच जिंकणार आहोत असा ठाम विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न

राजकारणात समज, गैरसमज निर्माण करून दिले जातात. लोकसभा सदस्य झाल्यामुळे मला मतदारसंघात फिरावे लागते. त्यामुळे तालुक्यातील लोकांच्या भेटी होत नसल्याचा खुलासा खा. लंके यांनी केला.

### २७ बुथवर मतदान वाढविण्याचा प्रयत्न करा

पारनेर-नगर मतदारसंघातील ३६५ बुथपैकी केवळ २७ बुथवर आपणास कमी मतदान झाले असून या बुथवरही मतदान वाढविण्यासाठी नियोजन करण्याची जबाबदारी आपली असल्याचे लंके यांनी सांगितले.

### महिलांच्या नेतृत्वाला संधी द्या

सज्जन व भक्कम कार्यकर्त्यांची फळी खा. लंके यांच्या पाठीशी आहे. याच फळीच्या जोरावर उत्तरेचे आक्रमण आपण परतवून लावले. कार्यकर्त्यांच्या पाठबळावर आपण लोकसभेची निवडणूक जिंकलो. महिला भगिनींनीही या निवडणूकीत दमदार बॅटींग केली. विधानसभेलाही हीच टीम अग्रभागी असेल. लोकसभेची पेरणी राणीताई लंके यांनी तीन ते चार वर्षे केली. आता महिलांच्या नेतृत्वाला विधानसभेत पाठविण्याची जबाबदारी आपली आहे.

**सुवर्णा धाडगे**, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी महिला आघाडी

### सुक्ष्म नियोजन करा

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून आपल्या मतदारसंघातील महाविकास आघाडीचा उमेदवार राज्यात सर्वाधिक मतांनी विजयी झाला पाहिजे अशा पध्दतीने नियोजन करा. सुक्ष्म पध्दतीने नियोजन करा. मागील निवडणूकीत आपण कुठे कमी पडलो. कोणाच्या काय अडचणी आहेत याचे नियोजन करण्याच्या सुचना लंके यांनी दिल्या.

### मानाचा फेटा

लोकसभा निवडणूकीत परीश्रम घेतलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा यावेळी मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. या निवडणूकीत विरोधी उमेदवाराकडून मोठा त्रास होउनही स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी कोणत्याही दबावास बळी न पडता या निवडणूकीत यश संपादन केल्याबद्दल खा. लंके यांनी यावेळी कृतज्ञता व्यक्त केली.

### तर राणीताईच्या हाती मशाल द्या

पाच वर्षापूर्वी शिवसैनिकांची भूमिका महत्वाची होती. यंदाच्या निवडणूकीतही शिवसैनिक अग्रभागी होते. विधानसभा निवडणूकीत जागा वाटपात घासाघीस झाली तर राणीताईच्या हाती मशाल द्या.

**मच्छिंद्र बेरड**, दरेवाडी

### जबाबदारी पेलण्यास कार्यकर्ते सक्षम

विधानसभा निवडणूकीमध्ये द्याल ती जबाबदारी नीलेश लंके प्रतिष्ठाण व राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते पेलण्यास सक्षम आहेत. राणीताई लंके यांनाच पक्षाची उमेदवारी असावी अशी सर्व कार्यकर्त्यांची मागणी आहे.

**जितेश सरडे**
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी आय टी सेल

### पारनेर शहरातून मताधिक्य देऊ

लोकसभेची निवडणूक धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी होती. प्रचारामध्ये सर्व कार्यकर्ते आहोरात्र झटले. आज फेटा बांधून खा. लंके यांनी सर्वांचा सन्मान केला असून आपण या ऐतिहासिक विजयाचे शिल्पकार आहोत. निवडणूकीच्या काळात अनेक कार्यकर्त्यांचे व्यवसाय बंद करण्याचा प्रयत्न झाला मात्र कोणीही त्यास भिक न घालता एकदिलाने खा. लंके यांचे एकदिलाने काम केले. लोकसभा निवडणूकीत पारनेर शहरात काहीसे मतदान कमी झाले. मात्र विधानसभा निवडणूकीत आम्ही मताधिक्य देऊ.

**अर्जुन भालेकर**, जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### जिल्हयात फक्त लंके पॅटर्न

खा. नीलेश लंके यांनी राजकारण करताना नैतिकता पाळली. गेली चाळीस वर्षे जिल्हात एक पॅटर्न होता. हा पॅटर्न संपला असून आता मात्र जिल्हयात एकच पॅटर्न तो म्हणजे नीलेश लंके हा आहे. हाच पॅटर्न राज्यातही फॉलो केला जात आहे.

**मारुती रेपाळे**, सरपंच, पुणेवाडी

### आमच्या भगिनीला विधानसभेची संधी द्या

लोकसभा निवडणूकीत राणीताई लंके यांनी दिवसरात्र मतदारसंघ पिंजून काढला. शेवगांवकरांसाठी राणीताई आमच्या भगिनी आहेत. आमच्या भगिनीला पारनेरकरांनी विधानसभेची संधी द्यावी.

**मल्हारी आव्हाड**, शेवगांव

### भरघोस मतांनी राणीताईंना विधानसभेत पाठवू

लोकसभेसाठी राणीताई लंके उमेदवार होत्या. मात्र शरद पवारांच्या आग्रहामुळे नीलेश लंके यांना निवडणूक लढवावी लागली. त्यांना आमदारकीचा राजीनामा द्यावा लागला. आता राणीताई लंके यांना भरघोस मतांनी विजयी करून विधानसभेत पाठविण्याची जबाबदारी आपली आहे.

**किसनराव रासकर**, संचालक, बाजार समिती

### कार्यकर्त्यांच्या भावना श्रेष्ठींपर्यंत पोहचवू

लोकसभा निवडणूकीत आपण इतिहास घडविला. मोठया शक्तीला घरी बसविण्याचे काम सर्व कार्यकर्त्यांनी केले. ज्यावेळी इतिहास लिहीला जाईल त्यावेळी तुम्हा सर्व कार्यकर्ते यांचे नाव निश्चित घेतले जाईल. विधानसभेसाठी राणीताई लंके यांच्या उमेदवारीची एकमुखी मागणी करण्यात आली असून कार्यकर्त्यांच्या या भावना पक्षाच्या वरीष्ठांकडे पोहचविल्या जातील.

**बाबाजी तरटे**, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### बुथ कमिटयांची पुनर्रचना

बुथ कमिटीच्या कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतल्याने लोकसभा निवडणूकीत त्याचा फायदा झाला. काही गावांमध्ये त्रुटी आढळून आल्या त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. मतदारसंघात एकूण ३६५ बुथ असून प्रत्येक बुथवर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे. बुथ कमिटयांची पुनर्रचना करण्यात येऊन त्यात चुकीची व्यक्ती येणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.

**भाऊसाहेब भोगाडे**
सचिव, नीलेश लंके प्रतिष्ठाण

### विरोधकांची उंची राहीली नाही

कोणत्या शक्तीचा पराभव केलाय हे पहा, मात्तबराला आस्मान दाखविले असून आता रेवडयावरची कुस्ती करणारे अंगाला हळद लावून भावी म्हणून मिरवू लागले आहेत. नीलेश लंके हे जो उमेदवार देतील तो उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होणार आहे. विरोधकांची उंची राहिलेली नाही.

**मोहन रोकडे**, वडगांव सावताळ

### राणीताई लंके यांनाच उमेदवारी हवी

लोकसभा निवडणूकीमध्ये प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांनी घरदार सोडून प्रचाराची धुरा सांभाळली. विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस तसेच प्रतिष्ठाणचे पदाधिकारी, कार्यकर्ते जिवाचे रान करून ही निवडणूक जिंकणार आहेत. महाविकास आघाडीची उमेदवारी राणीताई लंके यांना मिळावी अशी प्रतिष्ठाण व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची आग्रही मागणी आहे.

**बाळासाहेब खिलारी**
तालुकाध्यक्ष, नीलेश लंके प्रतिष्ठाण

### हंगे ग्रामस्थांना अभिमान

लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी खा नीलेश लंके यांच्या रूपाने आमच्या गावच्या सुपूत्राला संसदेत पाठविले. आता राणीताई लंके यांच्या रूपाने विधानसभेमध्येही हंगा गावाला संधी मिळणार आहे. ग्रामस्थांच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार. हंगे ग्रामस्थांसाठी ही अभिमानाची बाब आहे.

**राजेंद्र शिंदे**, सरपंच, हंगे

### घटक पक्षांना विचारात घेवून उमेदवारी जाहीर करावी


राणीताई यांनी आमदार व्हावे यात कोणाला शंका नाही मात्र उमेदवारी खा. नीलेश लंके यांनी जाहिर करावी. महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपण या निवडणूकीला सामोरे जाणार आहोत. आघाडीतील सर्व घटक पक्षांना, कार्यकर्त्यांना विचारात घेऊन उमेदवारी निश्चित करावी.

**राधाकृष्ण वाळुंज**, चास

### मताधिक्य देणाऱ्या गटाला ५ लाखांचे बक्षिस

राणीताईची उमेदवार निश्चित आहे. तर विरोधकांकडे भावींची मोठी गर्दी आहे. लोकसभा निवडणूकीत ज्या पध्दतीने आपण प्रचार केला त्याच पध्दतीने प्रचार करून राणीताई यांना विधानसभेत पाठवायचे आहे. जिल्हा परीषदेचा जो गट सर्वाधिक मताधिक्य देईल त्या गटाला पाच लाखांचे बक्षिस देण्यात येईल. खासदारकी, आमदारकी आपल्याकडेच असणार आहे. त्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही.

**सुदाम पवार**
प्रदेशाध्यक्ष, नीलेश लंके प्रतिष्ठाण



# चंदेरी

# अनुष्का प्रभासशी करणार नाही लग्न!



**४२ वर्षीय अनुष्का शेट्टी कन्नड चित्रपट निर्मात्याशी लग्न करणार आहे. अनुष्काची एंगेजमेंट झाली असून, लग्नाची तारीखही निश्चित झाल्याचा दावा करण्यात येत आहे. आतापर्यंत चाहत्यांचा अंदाज होता की अनुष्का शेट्टी बेस्ट फ्रेंड प्रभासला डेट करत आहे.**

बाहुबलीची देवसेना अर्थात अनुष्का शेट्टीबद्दल आलेली बातमी चाहत्यांना धक्का बसवू शकते. विशेषतः जे चाहते प्रभाससोबत तिच्या लग्नाचे स्वप्न पाहत आहेत त्यांच्यासाठी ही बातमी दुःखदायक ठरू शकते. अनुष्का शेट्टी अभिनेता प्रभाससोबत नव्हे तर कन्नड चित्रपट निर्मात्याशी लग्न करणार असल्याच्या बातम्या येत आहेत. लग्न या वर्षाच्या अखेरीस होणार आहे. अनुष्का आणि प्रभास खूप चांगले मित्र आहेत आणि त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. बाहुबली मालिकेत प्रभास आणि अनुष्काची जोडी सर्वांनाच खूप आवडली होती आणि तेव्हापासून त्यांच्या प्रेमसंबंधाच्या बातम्या येऊ लागल्या. त्याच्या लग्नाचीही चर्चा सुरू झाली होती. न्यूज ९ लाईव्हच्या रिपोर्टनुसार, ज्या प्रोड्यूसरसोबत अनुष्का लग्न करणार आहे तो ४२ वर्षांचा आहे आणि अनुष्काही ४२ वर्षांची आहे. प्रभास आणि अनुष्काबद्दल बोलायचे झाले तर तेलुगू चित्रपटसृष्टीतील हिट जोडी मानली जाते. या जोडीला खऱ्या आयुष्यातही एकत्र पाहण्याची चाहत्यांना नेहमीच इच्छा होती. काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत अनुष्का शेट्टीने प्रभाससोबतच्या अफेअरच्या बातमीवर म्हटलं होतं, की प्रभास माझा असा मित्र आहे ज्याला मी पहाटे ३ वाजताही कॉल करू शकते. आमची नावे अनेकदा एकमेकांशी जोडली जातात. कारण आम्ही विवाहित नाही. मात्र आमच्यात असं काही झालं असतं तर ते आतापर्यंत बाहेर आलं असतं. प्रभासनेही यावर प्रतिक्रिया दिली होती. त्याच्यात अन् अनुष्कात काहीही नसल्याचे त्याने सांगितले होते. प्रभासने असेहह सांगितले होते की, तो आणि अनुष्का दोन वर्षे इतका दीर्घ काळ आपले नाते लपवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या डेटिंगच्या बातम्या केवळ अफवा आहेत.

# पुष्पा २ रिलीज होण्यापूर्वी मोठा धक्का!

## संपादक अँटनी रुबेनने सोडला चित्रपट

**अल्लू अर्जुनच्या पुष्पा 2 : द रुल या चित्रपटाची प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहत आहे. हा चित्रपट 15 ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित होत आहे. मात्र आता चित्रपटाच्या प्रदर्शनाला केवळ 89 दिवस उरले असताना संपादक अँटनी रुबेन यांनी चित्रपट सोडल्याची चर्चा आहे.**



तारखा न मिळाल्याने हा सर्व प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. अशा परिस्थितीत पुष्पा २ पुन्हा पुढे ढकलला जाईल की काय, अशी भीती चाहत्यांना लागली आहे. मात्र, हे काम सातत्याने सुरू असून हा चित्रपट १५ ऑगस्टलाच चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे चित्रपटाच्या टीमचे म्हणणे आहे. अँटनी रुबेन सध्या वरुण धवनच्या बेबी जॉन या ॲटली निर्मित चित्रपटाच्या संपादनात व्यस्त आहेत. तो या चित्रपटाचा सहनिर्माताही आहे. अशा परिस्थितीत त्याला पुष्पा २ साठी वेळ काढता आला नाही. अँटोनी रुबेन यांनी यापूर्वी पुष्पा : द राइज, जवान, बिगिल, मेर्सल आणि विवेगम सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांचे संपादन केले आहे. रुबेन गेल्यानंतर दिग्दर्शक सुकुमार आणि अल्लू अर्जुन यांच्या अडचणी काहीशा वाढणार असल्याचं उघड आहे. चित्रपट किती चांगला बनवला जातो यात शेवटी सर्वात मोठी जबाबदारी त्याच्या संपादकाची असते. तो चित्रपटातील अनावश्यक दृश्ये काढून टाकतो आणि कथा पडद्यावर एका दमदार पद्धतीने सादर करतो. पुष्पा २ ची टीम आता राष्ट्रीय पुरस्कार विजेते संपादक नवीन नूली यांना सोबत आणण्याच्या तयारीत असल्याचे समजते. नवीनने यापूर्वी सुकुमारसोबत जूनियर एनटीआरच्या नन्नाकू प्रेमाथो (२०१६) आणि राम चरण स्टारर रंगस्थलम (२०१८) मध्ये काम केले आहे. त्याने २०२० मध्ये रिलीज झालेला अल्लू अर्जुनचा तेलुगू ब्लॉकबस्टर अला वैकुंठापुरमुलू संपादित केला आहे. तथापि, नवीन नूलीकडे सध्या पवन कल्याणचा तेलुगू गँगस्टर थ्रिलर, ओजी देखील आहे, जो या वर्षी सप्टेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. दुसरीकडे, या सर्व चर्चेदरम्यान, पुष्पा २ च्या टीमशी संबंधित लोकांनी हिंदुस्तान टाइम्सला सांगितले की, चित्रपटाचे प्रदर्शन ठरल्यानुसारच होईल. चित्रपटाचे काम आपल्या गतीने सुरू असल्याचे सांगण्यात आले. अहवालात म्हटले आहे की, अल्लू अर्जुन या महिन्यात चित्रपटाचे शूटिंग पूर्ण करेल आणि उर्वरित शूटिंग जूनपर्यंत पूर्ण होईल. त्यामुळे चित्रपटाला विलंब होण्याची शक्यता नाही.





# देवावर विश्वास आहे, पण कर्मकांडावर नाही...

## मधुने सांगितल्या आयुष्यातील रोचक गोष्टी!, फिटनेसचेही राज केले उघड...

**बॉलिवूड अभिनेत्री मधू (वय ५५) सध्या कर्तम भुगतम या चित्रपटामुळे चर्चेत आहे. श्रेयस तळपदेसोबत ती या चित्रपटात दिसणार आहे. याआधी तिने फूल और कांटे सारखा सुपरहिट चित्रपट आणि रोजासारख्या अविस्मरणीय चित्रपटात काम केले आहे. त्याद्वारे लोकांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. मधु बऱ्याच दिवसांनी बॉलिवूडमध्ये पुन्हा परतली आहे. कर्तम भुगतममध्ये श्रेयस तळपदेही हृदयविकाराच्या झटक्यानंतर पहिल्यांदाच पडद्यावर दिसत आहे. या अनुषंगाने झालेल्या एका विशेष मुलाखतीत त्यांच्याकडून जाणून घेतले की त्यांनी हिंदी चित्रपटांपासून दूर होण्याचे कारण काय? त्याचं पुनरागमन कसं झालं? आणि बरेच काही? वाचा ही खास मुलाखत...**

***रोजा चित्रपटात दिसत होतात, अगदी तसेच आजही सुंदर आणि फिट दिसत आहात. या फिटनेसचे रहस्य काय आहे?***

- *मधु : मी कमी अन्न खातो. आता आपली संस्कृती अशी झाली आहे की आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि मित्रांना दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण किंवा चहासाठी भेटतो. भूक नसली तरी तुम्ही जेवत राहा, पण माझा मंत्र आहे, की कमी खा. साधे जीवन जगा. मी सूर्यास्तानंतर जेऊ नये हा जुना नियम पाळते. मी रोज विश्रांती, योगा आणि चालणेदेखील करते. चार दिवस भरपूर डाएट किंवा व्यायाम केला आणि मग कंटाळा आल्यावर सोडून दिले असं करू नका. माझा सातत्यावर विश्वास आहे. मी दररोज माझ्या आहाराची आणि व्यायामाची काळजी घेते. त्याचाच हा परिणाम आहे.*

- फूल और कांटे सारख्या सुपरहिट चित्रपटातून तू बॉलिवूडमध्ये पदार्पण केलेस. रोजा सारखा हिट चित्रपट केला. मग ती अचानक हिंदी चित्रपटांतून का गायब झाली?
- मधु : खरं तर, मी एकाच वेळी पाच भाषांमध्ये काम करत होते. त्यामुळे कधी-कधी तारखांमुळे मला जास्त चित्रपट करता येत नव्हते, पण मी १९९१ ते १९९९ पर्यंत सतत काम केले. मी अभिमानाने सांगू शकते की मी कधीही घरी रिकामी बसली नव्हती. मी देवाच्या कृपेने खूप व्यस्त होते. मी हिंदीत जास्त काम केले नाही. याचे कारण मी एकाच वेळी पाच उद्योगांमध्ये काम करत असल्याने मला पाच वेगवेगळ्या भाषांमध्ये विभागले गेले. आजही प्रत्येक इंडस्ट्रीतील लोक मला वेगळ्या चित्रपटासाठी ओळखतात. नंतर मी इंडस्ट्रीतून ब्रेक घेऊन कुटुंबाला वेळ देण्याचा निर्णय घेतला होता.
- **आता कर्तम भुगतम या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये परतण्याचा निर्णय कसा घेतला?**
- मधु : खरं तर, मला आता अभिनय करायचा नाही असा विचार करून काही वर्षांसाठी इंडस्ट्रीतून ब्रेक घेतला. मला माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवायचा होता. तेव्हा मला समजले की मी एक अभिनेता आहे आणि नेहमीच अभिनेता राहीन. त्यामुळे त्या भावनेने मी पुन्हा चित्रपट करायला सुरुवात केली. आता मला आणखी काम करायचे आहे. मला या इंडस्ट्रीत राहायचे आहे. कारण मला ते आवडते. जेव्हा सोहम शाहने मला कर्तम भुगतम ऑफर केली आणि मला त्याची कथा आवडली तेव्हा मी त्याला हो म्हटलं.
- **कर्तम भुगतम् हे ज्योतिष आणि ग्रहांच्या हालचालींबद्दल आहे. या गोष्टींवर तुमचा किती विश्वास आहे?**
- मधु : जे म्हणतात की तुमचा सध्या चांगला वेळ नाही. जर तुम्ही मला पैसे दिले तर मी हे विधी करू शकतो,



पूजा करू शकतो. तर मला ते पटत नाही. ते मी अजिबात करत नाही. मला वाटत नाही की कोणीही माझे भविष्य अचूकपणे सांगू शकेल आणि कोणीही पूजा करून माझे भाग्य बदलू शकेल. मात्र, मी नशिबावर विश्वास ठेवते. माझा देव किंवा विश्वाच्या शक्तीवर विश्वास आहे. पण कर्मकांडावर विश्वास नाही.


- **९० च्या त्या काळात, अभिनेत्रींना बहुतेक ग्लॅमर म्हणून नृत्य आणि गाण्यासाठी ठेवले जात असे. इंडस्ट्रीमध्ये हिरोईनचे स्थान काळाबरोबर मजबूत झाले आहे यावर तुमचा विश्वास आहे का?**
- मधु : माहीत नाही. त्यावेळीही मी सर्व प्रकारच्या भूमिका केल्या. मला एक चांगली अभिनेत्री म्हणून ओळख मिळाली. ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. कारण जेव्हा मी चित्रपटांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मी चांगली अभिनेत्री होऊ शकत नाही असे सांगून नाकारण्यात आलं होतं. एखाद्या मुलीने आपल्या करिअरला सुरुवात करण्यापूर्वी अशी गोष्ट ऐकली तेव्हा तिला धक्का बसतो. त्यामुळे, त्यानंतर मी अभिनय, नृत्य, शब्दलेखन शिकून पूर्णपणे तयार होऊन परत आली. जेव्हा मला तू एक चांगली अभिनेत्री असल्याचे सांगण्यात आले तेव्हा मला हा माझा विजय वाटला. मी चांगली अभिनेत्री आहे की ग्लॅमर स्टार आहे हे मी कधी पाहिले नाही. मी दोन्ही प्रकारची कामे केली. मी शॉर्ट स्कर्ट घालून डान्सही केला आहे आणि साडी नेसून वेणी बांधण्याचे सीनही केले आहेत.
- **अजय देवगणच्या करिअरची सुरुवात तू केलीस.** त्यांच्यासोबतही मनापासून भावना. नंतर, तुम्ही त्याच्या किंवा इंडस्ट्रीतील कोणाच्या संपर्कात होता का?
- मधु : माझी अडचण अशी आहे की मी कोणाशीही संपर्क ठेवत नाही. एखादी गोष्ट मला स्वतःमध्ये बदलायची असेल तर ती म्हणजे ही सवय. ती मी बदलतही आहे. मला आता ज्यांची आठवण येते, त्यांना कॉल करते. बोलते. माझे जुने मित्र किंवा ओळखीचे कोणी कुठे दिसले तर मी जाऊन त्यांना नमस्कार करते. मी स्वतःमध्ये हे बदल आणत आहे, जे मी यापूर्वी केले नव्हते. मी याआधी कधीच कोणाच्या संपर्कात राहत नव्हती.

## कर्तम भुगतमची काय आहे स्टोरी?

थ्रिल, ड्रामा आणि सस्पेन्सने भरलेली ही कथा देव (श्रेयस तळपदे) न्यूझीलंडहून भारतात आल्यापासून सुरू होते. देव त्याच्या वडिलांची संपत्ती ताब्यात घेण्यासाठी भोपाळला आला आहे. बालपणीच आई गमावलेल्या देवचे संगोपन वडिलांनी केले. देवच्या वडिलांनी त्याला शिक्षण देऊन सक्षम बनवले. नंतर परदेशात नोकरीसाठी पाठवले. कोविड आला आणि त्याच दरम्यान त्याच्या वडिलांचे निधन झाले. देव त्यांना शेवटचाही भेटू शकला नाही. देवच्या वडिलांची इच्छा होती की त्याने नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय सुरू करावा. त्यासाठी त्यांनी कोट्यवधी रुपये जमा केले होते. आता वडिलांच्या निधनानंतर देव घरी परतला आहे. १० दिवसांत संपत्ती आणि पैशाची प्रकरणे पूर्ण करून परदेशात परतण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. पण त्याचे प्रत्येक काम कुठे ना कुठे अडत चालले आहे. याचदरम्यान देव अण्णांना (विजय राज) भेटतो. अण्णा म्हणजे माणसाचा हात धरून त्याची कुंडली सांगणारी व्यक्ती. अण्णांच्या बोलण्याने प्रभावित होऊन देव पूजा आणि ज्योतिषावर विश्वास ठेवू लागतो. त्याचं कामही हळूहळू होऊ लागतं. पण काही महिन्यांनंतर देवला अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो ज्याची त्याने कल्पनाही केली नसेल. असे का झाले हा चित्रपटाचा सर्वात मोठा ट्विस्ट आहे.

# पैशांमुळे अनिल कपूरने सोडला 'हाऊसफुल ५'


अनिल कपूरने अक्षय कुमारचा बिग बजेट चित्रपट हाऊसफुल ५ सोडल्याची बातमी आहे. साजिद नाडियाडवालाला अनिल कपूरने मागितलेली फी योग्य वाटली नाही, असे वृत्त आहे. वेलकम आणि वेलकम बॅक या चित्रपटानंतर नाना पाटेकर आणि अनिल कपूर ही हिट जोडी हाऊसफुल ५ मध्ये दिसणार होती. चाहतेही खूप उत्सुक होते.



अनिल कपूरचा निर्माता साजिद नाडियादवाला यांच्यासोबत फीसवरून वाद झाला होता. हाऊसफुल ५ मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख आणि अभिषेक बच्चन यांच्यासोबत नाना पाटेकर आणि अनिल कपूर यांनाही घेतले होते. त्यामुळे चाहत्यांच्या आनंदाला सीमा नव्हती आणि ते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. पण ताज्या बातमीने त्याचे मन मोडले आहे. मिड डेच्या वृत्तानुसार, साजिद नाडियादवाला आणि अनिल कपूर यांच्यात पैशांवरून बिनसले. अनिल कपूरने मागितलेल्या फीस साजिद नाडियाडवाला सहमत नव्हते. त्यामुळे निर्माते नाना पाटेकर यांच्या व्यक्तिरेखेवर नव्याने काम करत असल्याचे बोलले जात आहे. त्याची व्यक्तिरेखा पुन्हा लिहिली जात आहे. आता अनिल कपूरच्या भूमिकेसाठी अर्जुन रामपालसोबत चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र निर्मात्यांकडून अद्याप काहीही सांगण्यात आलेले नाही.

# शर्मीन सेगलने सांगितले लठ्ठपणामुळे आलेले अनुभव

**अभिनेत्री शर्मीन सेगलने विशेष मुलाखतीत तिला लठ्ठपणाबद्दल आलेल्या अनुभवांबद्दल सांगितले. शाळेच्या दिवसात ती खूप जाड होती आणि त्यामुळे तिची खिल्ली उडवली गेली. हिरामंडीच्या सेटवर भन्साळी तिच्याशी कसे वागायचे हेही शर्मीनने सांगितले.**



प्रसिद्ध चित्रपट निर्माते संजय लीला भन्साळी यांची भाची आणि अभिनेत्री शर्मीन सेगल सध्या हिरामंडी या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. या मालिकेत शर्मीनने मनीषा कोईरालाची मुलगी आलमजेबची भूमिका साकारली आहे. मात्र, शर्मीनला तिच्या अभिनयातील कमतरतेमुळे सोशल मीडियावर टीकेचा सामना करावा लागत आहे. पण शर्मीनला अशा परिस्थितीचा सामना करण्याची ही पहिलीच वेळ नाही. शर्मीनने सांगितले की, शालेय जीवनात जाड असल्यामुळे तिला खूप गुंडगिरीला सामोरे जावे लागले. तिने तिचे मामा संजय लीला भन्साळी यांच्याबद्दल देखील सांगितले. तिला फक्त त्यांची भाची व्हायचे नाही तर चित्रपटांमध्ये नाव कमवायचे आहे, असे ती म्हणाली.

शर्मीन म्हणते, की मी शाळेत असताना खूप लठ्ठ होती. लठ्ठपणाशी लढा देणेदेखील एक ताकद आहे. ते वास्तव स्वीकारणे, त्यावर काम करणे आणि अभिनेता बनणे या प्रवासात मी माझ्याबद्दल इतके शिकले की माझा सर्वात कमजोर क्षण माझा सर्वात मजबूत क्षण बनला, असे ती म्हणाली. संजय लीला भन्साळी यांच्या मालाल चित्रपटातून डेब्यू करणारी शर्मीन त्यांच्या दिग्दर्शनाखाली हिरामंडीमध्ये काम करत होती. अशा परिस्थितीत भन्साळींनी सेटवर दिग्दर्शक म्हणून किती आणि काका म्हणून कशी वागणूक दिली, यावर शर्मीन म्हणाली, की मी दहा वर्षांपासून त्यांच्यासोबत असिस्टंट म्हणून काम करत आहे. त्यामुळे काका आणि संजय सरांमधील फरक माझ्या मनात अगदी स्पष्ट आहे. मला त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. कारण त्यांनी आयुष्यभर चित्रपटांसाठी काम केले आहे.



## शॉर्ट न्यूज

### शिक्षक सोसायटीचा सन्मान सोहळा उत्साहात

■ **श्रीगोंदा :** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीचा सन्मान सोहळा उत्साहाच्या वाता वरणात पार पडला. श्रीगोंदा येथे माध्यमिक शिक्षक सोसायटी सभागृहात संस्थेच्या परंपरानुसार पदोन्नती मिळालेले मुख्याध्यापक, आदर्श मुख्याध्यापक, क्रीडा क्षेत्रात पुरस्कार प्राप्त झा लेले मुख्याध्यापक, सहकार क्षेत्रात संचालकपदी मिळालेला बहुमान अशा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना आमंत्रित करून सन्मानित करण्यात आले. या आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सोसायटीचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक दिलीपराव काटे हे होते.

### शिवसेना ठाकरे गट तालुका उपप्रमुखपदी उन्हाळे

■ **नेवासा :** तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाच्या उपतालुकाप्रमुखपदी प्रवरासंगम येथील कल्याण उन्हाळे यांची निवड करण्यात आली आहे. कल्याण उन्हाळे हे निष्ठावंत शिवसैनिक असून त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर उपतालुकाप्रमुख पदाची जबाबदारी सोपविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ शेळके यांनी दिली. संपर्क प्रमुख आमदार सुनील शिंदे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे, जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ शेळके, तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के, आदींनी अभिनंदन केले आहे.

### बदलापूर प्रकरणी शिवसेना आक्रमक

■ **संगमनेर :** बदलापूर येथे चिमुकलीवर घडलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी संगमनेर येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडी व शिवसैनिकांच्या वतीने त्या नराधमास फाशी देण्याची मागणी करत निषेध व्यक्त करण्यात आला. संगमनेर येथे उद्धव बाळासासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडी व शिवसैनिकांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. त्यासमवेत या घटनेतील पीडितांना न्याय देण्यास विलंब करणाऱ्या गृहखात्याचा धिक्कार देखील करण्यात आला.

### खा. वाकचौरेंचा श्रीरामपूरात जनता दरबार

■ **श्रीरामपूर :** शहर व तालुक्यातील अनेक लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी गरज पडेल तेव्हा श्रीरामपुरात जनता दरबार घेणार असल्याचे प्रतिपादन खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी केले. येथील प्रशासकीय इमारतीमध्ये प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंद वाघ, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, यांच्यासह जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.

# घुले कुटुंबाचे सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान

## खासदार नीलेश लंके यांचे गौरोद्गार



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरातील धार्मिक व सामाजिक कार्यात कांदा व्यावसायीक भिमाशेठ घुले व त्यांच्या कुटुंबाचे योगदान मोठे असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केले आहे.**

स्व. लक्ष्मण सदु घुले, स्व. भिमाबाई लक्ष्मण घुले, शांताबाई भिमाशेठ घुले यांचा एकत्रित पुण्यस्मरण कार्यक्रम निघोज येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी यावेळी खासदार नीलेश लंके व त्यांचे सहकारी तसेच परिसरातील सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नाशिक येथील प्रसिद्ध किर्तनकार अनिल महाराज तुपे यांचे किर्तन झाले. तुपे महाराज यांचा यावेळी खासदार लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

खासदार लंके यावेळी म्हणाले भिमाशेठ घुले यांनी कांद्याचा व्यवसाय करताना शेतकऱ्यांना चांगल्याप्रकारे भाव मिळवून देत सातत्याने शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम केले आहे. समाजात कार्यरत राहताना सामाजिक व धार्मिक कार्यात सातत्याने सहभागी होत आर्थिक योगदान दिले आहे. अशा प्रकारे आई वडील व परिवारातील दिवंगत सदस्यांची स्मृती जतन करीत त्यांनी दिलेले आदर्श प्रत्यक्षात कार्यरत आणत समाजाभिमुख काम केले म्हणून घुले कुटुंबाचा नावलौकिक शिरुर व पारनेर तालुक्यात आहे.

या वेळी अनिल महाराज तुपे यांनी धार्मिक सेवा आणि सेवाभाव याचे महत्त्व विषद करीत आपली हिंदू संस्कृती जगात श्रेष्ठ आहे ती टिकवण्यासाठी धार्मिक संप्रदाय अत्यंत महत्वाचा आहे. दरवर्षी पुण्यस्मरण निमित्ताने भिमाशेठ घुले परिवार किर्तन आणि अन्नदान या माध्यमातून पुण्यकर्म करीत असून समाजाने या कुटुंबाचे अनुकरण करावे तसेच खासदार नीलेश लंके यांचा नावलौकिक देशात असून आमदार व खासदार पदाच्या माध्यमातून त्यांनी विकासकामांची गंगोत्री दिली असून कोरोना काळातील काम म्हणजे मानवसेवेच्या माध्यमातून प्रत्यक्ष झालेली ईश्वरसेवा असल्याचे गौरवोद्गार तुपे महाराज यांनी व्यक्त केले आहे. यावेळी घुले परिवार, भावकी नातेवाईक, मित्र परिवार व आप्तेष्ट यांनी पुण्यस्मरण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी संदीप घुले व विजय घुले यांनी आभार मानले.

# बदलापुर प्रकरणातील नराधमाला चौकात फाशी द्या

## युवासेना शिवबा संघटना व शिवसेनेची मागणी

**निघोज : प्रतिनिधी**



**बदलापुर येथे ३ वर्षीय व ६ वर्षीय चिमुकलीवर अत्याचाराची घटना घडते अन फिर्याद घेण्यासाठी पिडीत कुटुंबाला रात्री १२ पर्यंत बसवुन ठेवले जाते. याचा संताप संपुर्ण राज्यात उमटला आहे. न्याय व्यवस्था अतिशय कुचकामी झालेली आहे. कोणालाही कायद्याची भीतीच राहिली नाही म्हणुन सातत्याने असले प्रकार घडत असल्याचे युवासेना तालुका प्रमुख व शिवबा संघटना अध्यक्ष अनिल शेटे यांनी सांगितले.**

सदर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मग त्याला तातडीने फाशी का देत नाही अशी भावना शिवसेना नेते संतोष येवले यांनी व्यक्त केली. सदर प्रकरणातील आरोपीला तातडीने शिक्षा देण्यात यावी यासंदर्भातील निवेदन देण्यात आले.

यावेळी अनिल शेटे,संतोष येवले ,सखाराम उजगरे,सुभाष भोसले,राजु लाळगे,साहेबराव पानमंद,संतोष साबळे,बाबाजी शिरोळे,अक्षय बेलोटे,राहुल तामखडे,श्रीधर गाडीलकर, मच्छिंद्र माळी,शिवाजी लाळगे,किरण सुपेकर,मोहन पवार, नवनाथ खामकर आदी उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

# आदर्श वृत्तपत्र लेखक : श्याम ठाणेदार

गेल्या २२ ऑगस्ट रोजी वृत्तपत्र लेखक दिन होता. बहुतेक वृत्तपत्रांमधून बहुतांचे अंतरंग, लोकमानस, वाचक पत्रे अशी सदरे चालविली जातात. संपादकीय पानावरच या सदरांना स्थान मिळालेले असते. त्यावरूनच या सदराचे महत्त्व कळून येते. यांतून विविध विषयांवर वृत्तपत्र लेखक आपले विचार मंथन प्रकट करीत असतात. वृत्तपत्र लेखक हा सरकार, जनता आणि वृत्तपत्र यांना जोडणारा सेतू असतो. वृत्तपत्रांच्या ध्येयधोरणाला या वृत्तपत्र लेखकांचे विचारमंथन उपयोगी पडते. श्याम बसप्पा ठाणेदार एक आदर्श वृत्तपत्र लेखक आहेत. आत्तापर्यंत त्यांची केसरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, तरुण भारत, सकाळ अशा विविध वृत्तपत्रांतून दीड हजारापेक्षा अधिक पत्रे प्रकाशित झालेली आहेत. त्यावरून श्याम ठाणेदार यांच्या पत्रलेखनाचा आवाका लक्षात यावा.

श्याम ठाणेदार यांचा जन्म २४ ऑगस्ट १९७९ रोजी झाला. पुणे जिल्ह्यातील दौंड हे त्यांचे मूळ ठिकाण. कै. गीताबाई मुकुंददास बंब प्राथमिक शाळा, दौंड येथे त्यांचे प्राथमिक शाळाशिक्षण झाले. शेठ ज्योती प्रसाद माध्यमिक विद्यालय दौंड, जि. पुणे येथे हायस्कूलचे शिक्षण झाले. महात्मा गांधी अध्यापक विद्यालय, पुणे येथून त्यांनी डी. एड. ही पदवी मिळविली (१९९९). डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातून ते बी.ए. उत्तीर्ण झाले (२००२). गेल्या २२ वर्षांपासून ते जि.प.प्राथमिक शाळाशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते पुणे जिल्ह्यातील कानगाव, ता. दौंड येथे तैनात आहेत. शिक्षकाची नोकरी करता करता ते आपली वाचन आणि लेखनाची आवडही जोपासत राहिले. समाजजीवनही पाहत-अनुभवीत राहिले. समाजाच्या विविध समस्या वृत्तपत्रांतून मांडीत राहिले. दारुबंदी या विषयावर काळाची गरज मथळ्याचे त्यांचे पहिलेवहिले पत्र १५ ऑक्टोंबर २०१४ रोजी केसरी दैनिकात प्रकाशित झाले. नंतर त्यांचा विविध वृत्तपत्रांत पत्रलेखन करण्याचा सपाटा चालूच राहिला.



उदाहरणादाखल ठाणेदार यांच्या काही पत्रांचे मथळे पाहता येतील :

*हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा (आधुनिक केसरी, ११/८/२४)
*फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सामना, २६/०७/२४)
*देशी वृक्षांची लागवड करा (लोकसागर, २८/०६/२४)
*आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्त्व कळले (लोकसागर,२५/०६/२४)
*भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा (श्रीगोंदा सिटीझन,१५/०६/२४)
*निष्काळजीपणा आणि बेपर्वाईमुळेच दुर्घटनांची मालिका (एकमत,२९/०५/२४)

ते एक चांगले लेखकही आहेत. आत्तापर्यंत त्यांचे आठशे तरी लेख विविध नियतकालिके आणि वृत्तपत्रांतून प्रकाशित झाले आहेत.

दूरदर्शनच्या एबीपी माझा, आयबीएन लोकमत, झी २४ तास, साम वाहिनीवर त्यांच्या प्रतिक्रिया दाखविल्या जातात. काही चॅनेलवर त्यांच्या मुलाखतीही प्रकट झाल्या आहेत.

त्यांच्या वृत्तपत्रीय पत्रलेखनाला आत्तापर्यंत वीसहून अधिक राज्यस्तरीय तसेच गोवा, कर्नाटक राज्यांतूनही पुरस्कार मिळाले आहेत.

*पंढरपूर संघटनेचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट पत्रलेखक पुरस्कार (२०१७)
*वीर लक्ष्मण अण्णाजी राणे पत्र भूषण पुरस्कार, मुंबई (२०१८)
*साप्ताहिक भगवे वादळ, मुंबई यांचा प्रबोधनकार ठाकरे पुरस्कार (२०२२)
*मराठी वृत्तपत्र लेखक संघ महाराष्ट्र राज्य यांचा राज्यस्तरीय पत्र भूषण पुरस्कार (२०२३)
*सह्याद्री फाउंडेशन, पुणे यांचा सह्याद्री रत्न पुरस्कार (२०२४)

असे श्याम ठाणेदार यांना मिळालेले नमुन्यादाखल काही पुरस्कार सांगता येतील.

वृत्तपत्र लेखक हा वृत्तपत्रांच्या संपादकीय विभागासाठी मदतनिसाचेच कार्य करीत असतो. तेही कुठल्याही मानधनाविना, विनावेतन आणि विना मेहनताना. जनतेची गाऱ्हाणी सरकारच्या कानी घालणे आणि सरकारच्या समाजकल्याणकारी योजनांची माहिती वृत्तपत्र लेखनाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविणे. वेळप्रसंगी जनता व सरकार अशा दोन्ही पक्षांवर टीकाटिप्पणी करणे हेही वृत्तपत्र लेखकाचे कार्य असते. त्यासाठी वृत्तपत्र लेखकाची चौफेर नजर असावी लागते. एक दृष्टी आणि विशिष्ट दृष्टिकोन असावा लागतो. सामाजिक बांधिलकी असावी लागते. ती श्याम ठाणेदार यांच्या ठिकाणी आहे. ती समाज, सरकार आणि वृत्तपत्रे यांना लाभकारक होत रहावी, ही सदिच्छा.

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**












# सर्वधर्मीय गुण्यागोविंदाने नांदणारा जिल्हा निर्माण करायचाय!

## खा. नीलेश लंके यांचे प्रतिपादन | तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने खा. लंके यांचा सत्कार




■ पारनेर-नगर मतदासंघातील मुस्लीम समाजाच्या वतीने खा. नीलेश लंके यांचा सत्कार करण्यात आला.

**पारनेर : प्रतिनिधी**

**सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदणारा अहमदनगर जिल्हा मला निर्माण करायचा असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.**

पारनेर-नगर मतदारसंघातील समस्त मुस्लिम बांधवांच्या वतीने खा. लंके यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी लंके यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांशी संवाद साधला.

खा. लंके म्हणाले, जितका मी मंदिरात नतमस्तक होतो, तितकाच आदर मला मस्जिद आणि चर्चबद्दल आहे. ठराविक जातीयवादी विचारांचे पक्षीय नेते मंडळी स्वत:ची राजकीय पोळी भाजण्यासाठीसमाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करत आहेत. त्यांचा हा डाव आपण हाणून पाडला पाहिजे असे सांगतानाच छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणारे आठरापगड जातींना सोबत घेऊन जाणारे हिंदुत्व मानणारा असल्याचे खा. लंके म्हणाले. अब्दुलसलामभाई, डॉ. आर जी सय्यद, उर शेख यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी मुस्लीम समाजातील १० वी व १२ वी मध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या ४० विद्यार्थ्यांचा तसेच शासकीय सेवेत दाखल झालेल्या ५ कर्मचाऱ्यांचा खा. लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अन्वर शेख, नुर कुरेशी, डॉ. मुदस्सीर सय्यद, अकील सय्यद, रमीज राजे, लतीफ राजे, रफीक शेख, अल्ताफ शेख, तौफिक पटेल, समिद शेख, असिफ मोमीन, जाफर शेख, फहाद राजे, दानिष सययद, सआद सययद, रेहान शेख ,दानिष राजे यांनी परीश्रम घेतले.

### एकजुटीसाठी कार्यक्रम

मतदारसंघातील उपेक्षित मुस्लीम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक उन्नती करीता समाजामध्ये एकजुट निर्माण करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे डॉ. सादीक राजे यांनी सांगितले.

### शिक्षणावर भर द्या

आरक्षणासबंधी मुस्लीम समाजाची उदासिनता दुर करून समाजाने आपल्या मुलाबाळांच्या प्रगतीकरीता शिक्षणावर भर दिला पाहिजे अशी अपेक्षा मुस्लीम ओबीसी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शौकतभाई तांबोळी यांनी व्यक्त केली.

### वक्फ बोर्ड विरोधी कायद्याला विरोध करा

मुस्लीम समाजाला शासकीय समित्यांवर योग्य ते स्थान देण्याच्या मागणीबरोबरच लोकसभेत मांडण्यात येणाऱ्या वक्फ विरोधी कायद्याला खा. लंके यांनी विरोध करण्याची आग्रही मागणी मौलाना इर्शादुल्हाह यांनी यावेळी बोलताना केली.

# लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपींना कठोर शिक्षा देण्याचा कायदा करा

## निघोज ग्रामस्थांची मागणी | बदलापूर घटनेच्या निषेधार्थ रास्ता रोको



**निघोज : प्रतिनिधी**

**लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपींना कठोर शिक्षा देण्याचा कायदा विधीमंडळ व संसदेत करण्याची निघोज ग्रामस्थांची मागणी केली आहे. गुरुवार दि.२२ रोजी सकाळी दहा ते साडेअकरा वाजेपर्यंत निघोज एसटी बस स्थानक परिसरात रास्ता रोको करून निघोज ग्रामस्थांनी बदलापूर अत्याचार घटनेचा जोरदार निषेध केला.**

यावेळी पारनेर व शिरूरकडे जाणाऱ्या शेकडो गाड्या थांबल्याने वाहतूक व्यवस्था पुर्णपणे कोलमडली होती ही वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीसांनी जवळपास एक तास परिश्रम घेतले. निघोज ग्रामस्थ व आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांच्या वतीने करण्यात आलेल्या या निषेध आंदोलनात ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, व्यापारी असोसिएशनचे कार्याध्यक्ष रामदासशेठ वरखडे, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पतसंस्थेचे संचालक ॲड. बाळासाहेब लामखडे, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, शिवसेनेचे युवा नेते महेंद्र पांढरकर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, प्रगतीशील शेतकरी उत्तम लामखडे, मळगंगा यात्रा उत्सव समीतीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, सतिष साळवे, मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य मनोहर एरंडे, छबुशेठ पाटोळे, तुकाराम सुपेकर, पोपट गुंड आदींनी आपल्या भावना व्यक्त करुन सरकार, पोलीस यंत्रणा तसेच बदलापूर येथील शाळा कमिटी यांचा निषेध करीत पोलिस यंत्रणा व सरकारने दाखवलेली दिरंगाई याबद्दल घटनेचा निषेध व्यक्त करीत या दुर्दैवी घटनेतील आरोपीला फास्ट ट्रॅक कोर्टात गुन्हा चालवून तातडीने फाशी देण्याची मागणी केली.

बदलापूर येथील या घटनेत शाळेच्या संस्था चालकांनी या निर्दयी कृत्य करणाऱ्या आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न केला म्हणजे एक प्रकारे या गुन्ह्याला पाठबळ दिले असून संस्थाचालकांना सहआरोपी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

तसेच जिल्हा परिषद मराठी शाळा, माध्यमिक विद्यालये तसेच उच्च माध्यमिक विद्यालये या ठिकाणी सातत्याने पोलिस बंदोबस्त ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

यावेळी निघोज येथील शाळेचे उदाहरण सांगताना उपस्थितांनी सांगितले की या ठिकाणी मुलिकादेवी विद्यालय व महाविद्यालय हा परिसर पंचवीस एकर पेक्षा जास्त आहे मात्र या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बागबगीचा असून निसर्ग रम्य परिसर असल्याने या ठिकाणी सातत्याने प्रिव्हिडींग फोटो सेशन व शुटींग सातत्याने सुरू असते यासाठी परवानगी कशी काय दिली जाते याबाबत चौकशी करण्याची गरज आहे लग्न न झालेली जोडपी या ठिकाणी सातत्याने आढळत आहेत यासाठी हा शाळेचा परिसर यासाठी कायमचा या लोकांना बंद करण्याची गरज आहे. हा परिसर हनीमून पॉइंट बनू नये यासाठी संबधीत संस्था चालक या ठिकाणी असणारे प्राचार्य व स्थानिक स्कूल कमिटी यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

निघोज व परिसरातील लोकसंख्येचा विचार करता पोलीसांची संख्या वाढविण्याची गरज आहे तसेच दोन पोलीस या शाळेच्या परिसरात बंदोबस्त देतील अशा प्रकारे व्यवस्था करण्याची गरज आहे. यावेळी कोलकता येथील डॉक्टर प्रकरणी घडलेल्या निंदनीय घटनेचा यावेळी निषेध केला. तसेच याबात पारनेर तालुक्यातील डॉक्टरांनी जो संप पुकारला होता तसेच तहसीलदार यांना निवेदन दिले त्याबाबत केंद्र व राज्य सरकारने जनतेच्या पाठीशी उभे राहून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरी भूमिका घेऊन संबंधीतांना कडक शासन करण्यासाठी कायदे कडक करीत गुन्हेगारांना तत्काळ शासन करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी केली. राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करुन महिलांना आर्थिक आधार देण्याचे चांगले काम केले असून विद्यार्थ्यांनी सुरक्षित राहिल्या पाहिजेत यासाठी विद्यार्थी सुरक्षा मोहीम राबवून त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करुण विधीमंडळात मंजूरी मिळवून तातडीने विद्यार्थी सुरक्षा समिती म्हणजे स्वतंत्र पोलिस दल निर्माण करावे अशी मागणी केली.

निघोज व परिसरात परप्रांतीय कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र याची नोंद ग्रामपंचायत किंवा पोलिस स्टेशन यांच्याकडे नाही. शाळा परिसरात सकाळ, संध्याकाळी हे परप्रांतीय कामगार मोठ्या संख्येने असतात. यातील बहुसंख्य कामगार सकाळी शाळा परिसरात असल्याने त्या ठिकाणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून सातत्याने होत असते. त्यांचा बंदोबस्त पोलीसांनी करूण परप्रांतीयांच्या नोंदी ग्रामपंचायत व पोलीस स्टेशन या ठिकाणी करून जनतेला व विद्यार्थी यांना संरक्षण देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच निघोज परिसर, शाळा, माध्यमिक विद्यालय महाविद्यालय या सर्व परिसरात सि सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात यावेत यासाठी सर्वतोपरी सहकार्य व्यापारी असोसिएशन करणार असल्याची ग्वाही देण्यात आली. यावेळी हेडकॉन्स्टेबल शिवाजीराव कडूस यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**बदलापूर घटनेचा निषेध करण्यासाठी पारनेर तालुक्यात पहिलेच रास्ता रोको आंदोलन निघोज येथे झाले. या आंदोलनाची तिव्रता पाहता सोशल मीडिया माध्यमातून आंदोलनाची तिव्रता तालुक्यातील गावांत पसरु नये व यातून काही हिंसक घटना घडू नये यासाठी सर्व मोबाईल नेटवर्क सेवा दिवसभरात सहा ते आठ तास बंद करण्यात आली होती. कोणत्याही प्रकारची आंदोलने चार दोन दिवसात होऊ नये यासाठी आंदोलन कर्त्यांना एकतर समजून सांगावे अन्यथा आंदोलकांवर गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करु असा इशारा पोलीस खात्यातील पारनेर येथील एका अधिकाऱ्याने दिला असल्याची माहिती आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांनी दिली. मात्र आम्ही आंदोलन करणारच कारवाई करा आम्ही समर्थ आहोत आमचे काय दोन नंबरचे धंदे नाहीत म्हणून पोलीसांच्या दमबाजीला भीक घालणार नाही असा इशारा ढवण यांनी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना दिला आहे.**

# संदीप राठोड यांना वसंतराव नाईक प्रेरणा पुरस्कार

## 'भूक छळते तेव्हा'कवितासंग्रहाची निवड



**निघोज : प्रतिनिधी**

**कष्टकरी विस्थापित मजुरांचा संघर्ष आपल्या लेखणीच्या माध्यमातून व्यक्त करणारे निघोज येथील ग्रामिण कवी संदीप राठोड लिखित भूक छळते तेव्हा कवितासंग्रहास महानायक वसंतरावजी नाईक प्रेरणा पुरस्कार जाहीर झालेला आहे.**

देवणी, जि. लातूर येथे रविवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी महानायक श्री वसंतरावजी नाईक विचार मंचने बंजारा समाज एकता मेळाव्याचे आयोजन केलेले आहे. हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या पंचेचाळीसव्या स्मृती दिनानिमित्त आयोजित बंजारा समाज एकता मेळाव्याचे अध्यक्ष महंत श्री शेखर महाराज असून श्री सत्यपाल महाराज, पंडीतराव धुमाळ, महेश जाधव, सोमनाथ वाडकर, किरण कोळपे, माणिक डोके, तानाजी चव्हाण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते कवी संदीप राठोड यांना महानायक श्री. वसंतरावजी नाईक प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

याआधी भूक छळते तेव्हा कवितासंग्रहास नऊ राज्यस्तरिय व एक राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहे. संदीप राठोड यांना महानायक श्री वसंतरावजी नाईक प्रेरणा पुरस्कार जाहिर होताच त्यांचे पारनेर साहित्य साधना परिवाराकडून तसेच विविध स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

# शेतपाणंद रस्त्यांसाठी आता सत्ताधारी, विरोधकांना साकडे

## शिवपाणंद रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांचा पुढाकार



**सुपा : प्रतिनिधी**

**मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ६० दिवसांत शेतरस्ते खुले करण्याचे आदेश दिलेले असतानाही त्या आदेशाची तहसिलदार पातळीवर कार्यवाही होत नसल्याने शिवपानंद चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी सत्ताधारी तसेच विरोधकांची भेट घेऊन या प्रश्नी न्याय देण्याची मागणी केली आहे.**

पवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे, खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेत शेतपानंद रस्ते खुले करण्याचे साकडे घातले.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील तहसिल कार्यालयांमध्ये प्रलंबित रस्ता केसेस तातडीने निकाली काढण्याचे आदेश देण्यात यावेत, समृध्द गावांसाठी ग्रामसेवक स्तरावर समित्या स्थापन करण्याचे आदेश ग्रामपंचायतींना द्यावेत, त्याच्या कार्यवाहीचा अहवाल शासनाने घ्यावा, चालू वहिवाटीच्या प्रत्येक शेतरस्त्याचे सर्वेक्षण करून त्याच्या नोंदी गाव नकाशावर घेण्यात याव्यात, शेतरस्ता बंद करणारांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत, शासन निर्णयाप्रमाणे मोजणी शुल्क व पोलीस संरक्षण फी घेऊ नये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी, नमुने हटविणारांवर दंडात्मक कारवाई करावी, तहसिल कार्यालयामार्फत दिलेल्या शेतरस्त्याच्या निकालाच्या अपिलानंतर प्रांत यांनी अथवा अधिकाऱ्यांमार्फत चौकशी कयन आपल्याच कार्यालयामार्फत सदर रस्त्याचा अंतिम निकाल द्यावा, तो अर्ज पुनरावलोकनासाठी तहसिल कार्यालयाकडे पाठविणे बंद करावे, शेतरस्त्यांअभावी पडीक राहणाऱ्या शेतजमीन धारकांना तात्काळ विना अट नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# चोंभूतला खा. नीलेश लंके यांची लाडूतुला!

## गावकऱ्यांनी केली नवसपूर्ती | नागरी सत्कारही संपन्न




**चोंभूत : स्वप्निल भालेराव**

**नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील खासदारपदी निवडून आलेले लोकप्रिय खा. नीलेश लंके यांच्या विजयानिमित्त चोंभूत येथील नागरिकांनी भव्य नागरी सत्कार केला तसेच त्यांच्या विजयासाठी ग्रामदैवतास केलेला नवसपूर्ती झाल्याने लाडूतुला करून गावकऱ्यांना लाडुचे वाटप करण्यात आले. यावेळी नव्याने मुंबई लोहमार्ग विभागात पोलीस शिपाई धनंजय पावसा बरकडे यांचाही सत्कार करण्यात आला.**

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक गंगाधर शेळके, लक्ष्मण म्हस्के, लोकनियुक्त सरपंच कांचन म्हस्के, उपसरपंच निर्मला माळी तसेच ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक पोपट माळी यांनी केले तर आभार दत्तात्रय म्हस्के यांनी मानले. सूत्रसंचालन लहू साबळे यांनी केले.

नागरी सत्कार समारंभ प्रसंगी खा. नीलेश लंके यांनी आपल्या विजयाचा इतिहास उपस्थितांना सांगितला व तालुक्यातील काही गावाबद्दल खेद ही व्यक्त केला. ते भाषणावेळी म्हणाले की, पारनेर तालुक्यातील प्रत्येक कोपऱ्यात गेली साडेचार वर्ष सातत्याने मी फिरत आलेलो आहे. ज्या भागात विकासकामे पोहचली नाही तिथे जातीने लक्ष देऊन त्याभागात विकासकामे मंजूर केली. बऱ्याच कार्यक्रमांना मी हजर राहिलोय. माझ्या अनुपस्थित माझी पत्नी, बंधू, वडील यांनी हजेरी लावलेली असताना. काही गावात मताच्या बाबतीत नाराजी व्यक्त केलेली दिसून आलेली आहे. चोंभूत गावाच्या बाबतीतही असच झालेले आहे. मतविभागणी जर होत असेल तर ही गंभीर बाब असल्याची खंत खा. लंके यांनी व्यक्त करून केली. ही चुक आगामी विधानसभेला न करता उभ्या असणाऱ्या उमेदवाराला विजयी करावे अशी इच्छा व्यक्त केली.

### मी केलेला नवस पूर्ण झाला

तालुक्याचे सुपुत्र. मा. नीलेश लंके हे खासदार व्हावेत यासाठी ग्रामदैवतास मी नवस केला होता. तो पूर्ण झाल्याचा आनंद आहे.लाडू तुला करून संपूर्ण ग्रामस्थांना लाडू वाटप करण्यात आले.

लक्ष्मण बाबुराव म्हस्के
ज्येष्ठ मार्गदर्शक

### म्हस्केवाडी -अळकुटी रस्ता लवकरच मार्गी लावणार

दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा रस्ता म्हणजे म्हस्केवाडी -अळकुटी रस्ता हा लवकरात लवकरत कसा पूर्णत्वास जातो याकडे लक्ष देणार असून लवकरच त्या रस्त्याची समस्या दूर होणार आहे.

खासदार नीलेश लंके

### तुम्ही विकासकामे दिली मात्र विरोधकांनी अडवली

चोंभूत सारख्या शेवटच्या गावात लोकनेत्यांच्या माध्यमातून भरघोस निधी उपलब्ध झाला. त्यातील बरीच कामे मार्गी काढली मात्र विरोधकांनी कामांना खवाडा घातल्याने मोठी अडचण निर्माण झाली असून. ग्रामस्थ विकासकामापासून वंचित राहिल्याची खंत गावचे माजी उपसरपंच दत्तात्रय म्हस्के यांनी व्यक्त केली.

# पाडळीदर्या येथे मुक्कामी बस सुरू करा

## खा. नीलेश लंके यांची पारनेर आगाराला सुचना



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर, निघोज, देवीभोयरे येथे शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी, नोकरीसाठी जाणारे कर्मचारी तसेच कामानिमित्त तालुक्याला जाणारे ग्रामस्थ यांच्या सोयीसाठी पारनेर तालुक्यातील पाडळीदर्या येथे मुक्कामी बस सुरू करण्याची सुचना खा. नीलेश लंके यांनी पारनेरच्या आगार व्यवस्थापकांकडे पत्राद्वारे केली.**

खा. लंके यांचे सहकारी अनिल गंधाक्ते, भाऊ निवडूंगे यांनी पारनेर आगार प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची भेट घेउन खा. लंके यांचे पत्र सुपूर्द केले. यासंदर्भात पाडळीदर्या ग्रामपंचायत, मुलिकादेवी विद्यालय निघोज, अंबिका विद्यालय देवीभोयरे यांच्यावतीनेही विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बस सुरू करण्यासंदर्भातील पत्र दिले आहे.

अंबिका विद्यालयात पाडळीदर्या व परीसरातील २५ विद्यार्थी येतात. त्यांना बस उपलब्ध नसल्याने त्यांना पायी यावे लागत असल्याचे पत्रात नमुद करण्यात आले आहे. मुलीकादेवी विद्यालयात पाडळीदर्या वडझिरे, बाभुळवाडे, देविभोयरे फाटा, वडगांव गुंड येथून ३० ते ३५ विद्यार्थी शाळा महाविद्यालायात येतात.

सकाळी पावणेसात वाजता पाडळी दर्या येथून मुक्कामी असणारी बस सुटत असल्याने विविध गावांमधील विद्यार्थ्यांची सोय होत होती. ही बस बंद झाल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेउन ही बस सुरू करण्याच्या सुचना खा. लंके यांनी पारनेरच्या आगारप्रमुखांना केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com